जा. क्र. न. अ. / बां. प./१३७६
नगर अभियंता कार्यालय,
सोलापूर. दि. १३/०५/२०१९

# सोलापूर महानगरपालिका

# जाहीर प्रसिद्धीकरण

पावसाळ्याच्या दिवसात जोरदार पावसामुळे शहरातील जुनी आणि कमकुवत घरे / चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जीवित व वित्त हानीही संभवते. सदर बाबी टाळण्यासाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरिकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुव्यवस्थित राखण्याची जबाबदारी संबंधित घर मालकांची / भोगवटदारांची आहे. यासाठी जुन्या व कमकुवत घरांच्या मालकांनी / भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वतः करून घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. बांधकाम परवानगीसाठी महानगरपालिका प्राधिकृत परवानाधारक इंजिनिअरमार्फत रितसर अर्ज करून, परवानगी घ्यावी.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतींची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (**Strutural Stability**) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांच्याकडून तपासून घेऊन त्यांचे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत दैनिक वृत्तपत्रामध्ये वेळोवेळी जाहीर प्रसिद्धीकरण देण्यात आलेले आहे. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर याची यादी बांधकाम परवानगी विभागाकडे नागरिकांकरिता उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदरची यादी महानगरपालिकेच्या वेबसाईटवरही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं. २७४०३६४ ते ६८, २६०४५२५ व १०१, नगर अभियंता स्टोअर - ०२१७-२७४०३३५, तक्रार निवारण कक्ष - ०२१७-२७२३४७९, १८००२३-३१९१६, १८००२३३१९१४ या कार्यालयांना नागरिकांनी त्वरित कळवावे.

तरी सर्व घरमालकांनी भोगवटदारांनी व नागरिकांनी पावसाळ्यात इमारती, झाडे व इलेक्ट्रीकल पोलपासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जीवित व वित्त हानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**सही/- आयुक्त- सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

Scanned by CamScanner